International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारतीय ख्याल गायनातील घराणी आ ण साथ संगत

म लंद क. पोटे.

गोषवारा :

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील प्रत्येक गायक कलाकाराबरोबर साथीदार असतात. त्यापैकी तबला व संवादिनी संगतकार, तानपुरा संगतकार  कंवा सारंगी संगतकार इत्यादी. यापैकी तबला या वाद्याची साथ आपण येथे बघणार आहोत. भारतीय शास्त्रीय संगीतात  व वध गायन शैली या  पढ्यानु पढ्या चालत आलेल्या आहेत. याच  व वध शैलींना सांगीतिक भाषेत 'घराणी' असे म्हटले जाते. वेगवेगळ्या घराण्यांच्या आपआपल्या अश्या गायन शैली प्र सद्ध आहेत. प्रत्येक घराण्याच्या गायन शैलीत वेगवेगळे वै शष्ठ्य आहे. याच वै शष्ठ्यांच्या आधारे तबला संगतकाराला आपली साथसंगत बदलावी लागते. गायन शैली व गायक कलाकाराच्या गायनाच्या लकबीप्रमाणे संगत बदलली जाते व तसे अपे क्षतही आहे. प्रस्तुत लेखात 'घराण्यानुरूप तबला साथसंगत' या  वषयीचे थोडक्यात  वश्लेषण केलेले आहे. यासाठी जयपूर, ग्वाल्हेर व  कराणा या तीन निवडक घराण्यांचे  वश्लेषण केले आहे.

## प्रस्तावना

भारतीय अ भजात शास्त्रीय संगीत हे अतिशय  वस्तृत आ ण व्यापक स्वरुपात जगभर ऐकावयास  मळते. बुजुर्ग लोकांनी असं म्हटल आहे की, 'व्यक्ती तितक्या प्रकृती'. ही म्हण संगीतासही लागू पडतांना दिसते. म्हणजे गुरूने  शकवलेली  वद्या जशीच्या तशी, त्यात तसूभर कोणत्याही प्रकारे बदल न करता आजन्म सादर करणे  कंवा  शक वणे, असं न करता स्वतः काहीतरी कल्पकतेने व सौंदर्यपूर्णतेने त्यामध्ये बदल करून सादर करणे. यामुळे गायनामध्ये वेगवेगळ्या  शष्यांनी, त्यांच्या  शष्यांनी बदल करत भारतीय ख्याल संगीत  वस्तृत व व्यापक केल्याचे पाहायला  मळते. त्यामुळे आज भारतीय शास्त्रीय ख्याल संगीतात  व वध घराणी निर्माण झालेली दिसतात. जसे की ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा,  कराणा, पतियाळा, भेंडीबाजार, बनारस, रामपूर सेहेसवान इ. तसेच त्या घराण्यातील  शष्यांनी कल्पकतेने सादरीकरण केल्याने घराणेदार गायन शैली पाहायला  मळतात. प्रत्येक  शष्याचे गायन थोड्याफार प्रमाणात वेगळे ऐकावयास येते. त्यामुळे अशा घराणेदार शैलींनुसार साथ संगतीतही तबलावाद्काने साथीमध्ये बदल करत कला वष्कार अ धक

सौदर्यपूर्ण केलेला पहावयास मळतो. तसेही केले पाहिजे. तबला संगतकाराने त्या त्या घाराण्यानुसार साथ संगतीचा अभ्यास केल्यास साथ अ धक पोषक ठरते.

❖ घराणी संकल्पना :

घराणे म्हणजे व शष्ट प्रकारची शीस्त, निश्चितपणा असे काही कलाकार सांगतात. घराणे म्हणजेच स्वर, लय आ ण बंदिश या भारतीय संगीतातील मूलभूत संकल्पनांमध्ये स्वतःचे असे वेगळे वै शष्ठ्य पढ्यान पढ्या जपणे म्हणजेच घराणे होय. यामध्ये काही घराण्यांनी स्वर प्रधानता अधीक जोपासली तर काही घराण्यांनी लय प्रधानता अ धक जोपासली. रागातील आलापी, व शष्ट लायाकृतिच्या तानांची बांधणी, ठरा वक ताल, याच्या वेगवेगळ्या पद्धतीमुळे प्रत्येक घराण्याची गायकी वेगळी ठरली. हिंदुस्तानी संगीतातील निवडक तीन घराण्यां वषयी इथे वचार केला आहे. ग्वाल्हेर, जयपूर आ ण कराणा या घराण्यातील परंपरेत होणाऱ्या गायन क्रयेत साथसंगत वेगवेगळी असते. यामध्ये प्रत्येक घराण्याच्या वै शष्टये आ ण परंपरांचा आधार घेऊन त्यातील साथसंगतीचा अभ्यास केला आहे.

❖जयपूर घराणे:

असे मानले जाते की, अल्लादियाखाँ यांनी जयपूर घराणे निर्माण केले. या घराण्याची खा सयत म्हणजे खुला आकार, शस्त प्रय मांडणी, व वध तानांचे वक्र प्रकार, अनवट रागांचे गायन, एकच बंदिश वेगवेगळ्या तालात सादर करणे. प्रत्येक घराण्याचे वै शष्ट म्हणून ठरा वक तालांचा वापर केलेला दिसतो. जयपूर घराण्यानी वलंबित तीनताल आपलासा केला.

तीनताल वाजवता आला म्हणजे साथ संगत आली असं नाही, तर तो तीनताल प्रत्येक कलाकाराच्या कला वष्कारास पोषक असावा. यासाठी त्या तबला वादकाला घराण्याची व गायकाची वै शष्ठ्ये समजणे आवश्यक आहे.

जयपूर घराण्यात बंदिशीला खूप महत्व दिले आहे. बंदिश गाताना ती बंदिश बीट-टू-बीट जशी शकवली आहे, तशीच ती गायली जाते. प्रामुख्याने बंदिश आ ण राग वस्तार हा मात्रेला (beat) सोडून केला जातो. वेगवेगळ्या तानक्रीयांच्या वेळी तबला वादकाने संय मत व सयुोग्य साथ करणे अपे क्षत असते. तबला वादकाने या शैलीतील वै शष्टयांचा अभ्यास करून गायकास योग्य आ ण समर्पक साथ केली पाहिजे.

जयपूर घराण्यामध्ये राग-स्वर वस्तार होताना, ठेका वाजवताना जास्त भरलेले चालत नाही. स्वर वस्ताराच्या वेळी शक्यतो शुद्ध ठेका अपे क्षत असतो. जयपूर गायकीमध्ये एकाच रागातील एक बंदिश वेगवेगळ्या तालामध्ये गायची पद्धत आहे.

अशाप्रकारे या घराण्यातील गायकीचा आ ण त्यातील वेगवेगळ्या वै शष्ठ्यांसह कलाकारांच्या गायनशैलीचा अभ्यास करणे व त्यानुसार साथ करणे आवश्यक आहे. तरच तबला वादकाकडून जयपूर गायकीत पोषक, समर्पकसाथ आ ण सौंदर्ययुक्त साथ संगत होऊ शकते.

❖ग्वाल्हेर घराणे:

'नत्थन पीरबख्श' हे या घराण्याचे प्रवर्तक मानले जातात. ग्वाल्हेर घराण्यातील गायकीमध्ये राग, ठेका, बंदिशीचे शब्द यांना प्राधान्य दिले जाते. या घराण्यात प्रचलीत रागांबरोबरच अनवट रागांचे सादरीकरणही तेवढ्याच सहजतेने व कौशल्यपूर्ण पद्धतीने केले जाते. ग्वाल्हेर गायकीमध्ये बंदिशीनुसार राग वस्तार केल्याने रागरूप हे अधीक वै शष्ठ्यपूर्ण व प्रभावशाली रीतीने मांडता येते.

सर्वसामन्यपणे सर्वस्तरातील श्रोत्यांना आकलन होणारी व प्रभावी वाटणारी लय म्हणजे 'मध्य लय'. त्यामुळे या घराण्यामध्ये मध्य लयीचा अधीक उपयोग केला आहे असे म्हणतात. त्यामुळेच या घराण्यातील गायकांना वै वध्यपूर्ण पद्धतीने समेला येणे सहज शक्य होते. ख्यालामध्ये लय वाढवल्यानंतर बोल अंगाने व लयकारीयुक्त स्वरांचा वचार व वस्तार केला जातो. स्पष्ट आकार, त्यातला प्रवाहीपणा, बेहलावा, लयकारी, तान आ ण खेच ही या घराण्याच्या गायनाची वै शष्ठ्ये आहेत.

प्रत्येक कलाकाराबरोबर तबलावादाकाने त्या कलाकाराच्या गायकीप्रमाणे साथसंगत केली पाहिजे आ ण तरच कला वष्कार हा अ धक दर्जेदार होईल. प्रत्येक कलाकार आपापल्या प्रतीभेनुसार राग व बंदिशीचा वस्तार करतो, त्यानुसार साथीदारानेही आपले बुद्धीकौशल्य वापरून आपली वादनपद्धती बदलली पाहिजे. ग्वाल्हेर घराण्यामध्ये वलंबित लयीतील राग वस्तार, आलाप कंवा बोलआलाप चालू असताना तबला वादकाने ठेका, गायनाच्या चालीप्रमाणे योग्य शब्दांचा भरणा करत गायकाच्या बरोबरीने साथ संगत करावी. गायकाची सहमती असेल तर तबला वादकाने बरोबरीने वाजवावे.

या घराण्यात वशेषतः तिलवाडा, झुमरा, आडाचौताल अशा ठेक्यांचा उपयोग केला जातो. ह्या प्राथ मक गोष्टी तबला संगतकाराला माहिती असणे अत्यंत जरुरी आहे. त्याचबरोबर या घराण्यामध्ये ठेका वाजवताना लय-तालाचे काम वै शष्ट्यरित्या व सौंदर्यपूर्ण पद्धतीने केले जाते. अशा गायकीबरोबर साथ करताना तबलावादक कायमच जागरूक असला पाहिजे.

❖ कराणा घराणे:

उस्ताद अब्दलु करीम खा हे ' करणा' घराण्याचे प्रवर्तक मानले जातात. कराणा घराण्यातील गायक आपल्या प्रस्तुतीसाठी प्रच लत, सोपे व श्रोत्यांच्या परिचयाचे राग निवडतात, असे म्हणले जाते. गायकी स्वरप्रधान असल्याने एक एक स्वर व्यवस्थित उलगडत वस्तार केला जातो. सुरेलपणा हा या गायकीचा आत्मा आहे.

स्वर प्रधान गायकी असल्यामुळे या घराण्याच्या गायक/गायिकांबरोबर संगत करताना तबला वादकाला अतिशय संयमतपणे दाया-बायाचा योग्य समतोल राखून तसेच तबला वादनात आसयक्तु संगत करणे खूप महत्वाचे आहे.

तबला वादकाने डग्ग्याचा योग्यप्रकारे व संतुलत वापर करत योग्य आभास निर्माण करणे, सौंदर्य दृष्टीने व उत्तम साथीदार या नात्याने आवश्यक असते. अर्थात गायकाची मानसक स्थिती बघून (Mood) व त्याच्या आवडीनुसार साथ करावी.

संपूर्ण ख्याल वस्तारात तबला वादकाने सुरेल, आसयुक्त व भरदार ठेका देणे अपेक्षत आहे. अतिशय संथ लयीत आ ण अ धक काळ चालू असलेल्या स्वर वस्तारावेळी, ठेक्याची अती वलंबित लय व गुंजनयुक्त ठेका कायम ठेवण्याची मोठी जबाबदारी तबला संगतकारावर असते.

प्रत्येक तबला संगतकाराने सर्व घराण्यांचा नीट अभ्यास करावा. अमुक घराण्याचा कलाकार म्हणजे अमुक ताल/ठेका, हा समज करून घेऊ नये. यासाठी जमेल तेवढ्या कलाकारांचे गायन ऐकायची सवय केली पाहिजे, म्हणजे साथ उत्तम होईल.

निष्कर्ष :-

अशा प्रकारे वरील गोष्टींचा अभ्यास लक्षपूर्वक व जाणीवपूर्वक करून तबला वादकाने साथ संगत केली, तर तो निश्चतच एक प्रभावी व यशस्वी संगतकार होईल. त्याच्या अभ्यासू प्रवृत्तीमुळे त्याच्या साथसंगतीमधे आनंद निर्माण होईल. रंजकतेमधे वृद् ध होईल. मुख्य कलाकाराच्या संगीत प्रवासात रममाण होईल. गायन कलेतील बारकावे समजतील व यामुळे साथ अ धक सुयोग्य, स्पष्ट व रंजक होईल.

संदर्भ सूची :-

१) तालयोगी तळवलकर सुरेश, आवर्तन, राजहंस प्रकाशन, प्र.आ. २०१४
२) पं. मुळगावकर अर वंद, तबला,साधना प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९७५
३) पं. माईणकर सुधीर, तबला वादन कला और शास्त्र, प्रकाशक अ.भा.गंधर्व महा वद्यालय मंडळ, मरज
४) डॉ. ठाकूर जयदेव संह, भारतीय संगीत का इतिहास, प्रकाशक संगीत रिसर्च अकादमी, कलकत्ता, प्र.आ. १९९४